**फौजदारी कि. अर्ज क्र. –०१/२०२२**

**राणी मनोज नेरकर –वि– मनोज गोपाल नेरकर**

**CNR No.** MHYA-1800-0386-2022

## निशाणी क्रमांक –१२ वर आदेश

०१) प्रस्तूत प्रकरण अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १२५ अन्वये अंतरिम पोटगी मिळण्याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

०२) अर्जदाराचे कथन आहे की, गैरअर्जदाराने दि. २०/४/२०२१ रोजी घाटंजी, जि. यवतमाळ येथे रेणुका मंगला माता मंदीरामध्ये अर्जदारासोबत विवाह केला. त्यावेळी अर्जदाराचे नातेवाईक व इतर लोक उपस्थित होते. विवाहनंतर अर्जदार गैरअर्जदाराकडे नांदावयास गेली असता गैरअर्जदाराने अर्जदारास शारीरिक व मानसिक त्रास दिला. गैरअर्जदाराने त्यास महत्वाचे काम आहे, आणी बाहेर गावी जावयाचे आहे, असे सांगून अर्जदारास काही दिवस माहेरी राहण्यास सांगितले. त्यानंतर तो अर्जदारास घेण्यास येईल, असे सांगितले. त्यामुळे अर्जदार स्वतः माहेरी आली. तथापि, गैरअर्जदार हा अर्जदारास घेण्यास आला नाही. त्यामुळे अर्जदार स्वतः गैरअर्जदाराच्या रुमवर गेली असता घर मालकाने गैरअर्जदार याने रुम सोडल्याचे सांगितले. त्यामुळे दि. २८/६/२०२१ रोजी अर्जदार सासरी गेली असता, सासरच्या लोकांनी अर्जदारास शिवीगाळ करुन मारहाण केली. अर्जदार स्वतःची उपजिवीका भागवण्यास असमर्थ आहे. गैरअर्जदार न्यायालयात शिपाई म्हणून नोकरीस आहे व त्यास दरमहा रक्कम रुपये २५,०००/– वेतन मिळते. मुळ अर्जाचा निकाल लागण्यास कालावधी लागणार आहे. दरम्यान अंतरीम खावटी/निर्वाह भत्ता दरमहा रक्कम रुपये १०,०००/– देण्याबाबत विनंती केली.

०३)        गैरअर्जदाराने नि.क्र. १३ वर म्हणणे दाखल केले आहे. गैरअर्जदाराने विवाह संबंध मान्य नसल्याचे कथन केले आहे. गैरअर्जदाराने अर्ज परिच्छेद क्र. १ ते ५ मधील मजकूर खोटा व बनावट असल्याचे कथन करुन नाकबूल केला आहे. गैरअर्जदाराने पुढे असे कथन केले आहे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह झाला नसल्याने अर्जदारास गैरअर्जदाराकडून खावटी मागण्याचा कायदेशिर अधिकार नाही. सबब, अर्ज खर्चासह नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

०४)        अर्जदार व गैरअर्जदार यांचे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. उभय पक्षकारांची विवादीत कथने व अभिलेखाचा विचार करता पुढील मुद्दे विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | गैरअर्जदार याची पुरेशी ऐपत असताना देखील त्याने अर्जदाराचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केल्याचे, अर्जदार शाबित करते काय? | : | होकारार्थी |
| २. | अर्जदार ही गैरअर्जदार याचेकडून दरमहा अंतरिम पोटगी मिळवीणेस पात्र आहे काय? असल्यास किती ? | : | अंशत: होकारार्थी, दरमहा रू. ३,५००/– |
| ३. | आदेश काय ? | : | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो... |

## **कारणमिमांसा**

**<u>वादप्रश्न क्र.१ करीता :-</u>**

०५) गैरअर्जदार याने अर्जदाराशी विवाह संबंध नाकारले असल्याने सदर विवाह संबंध प्रथम दर्शनी शाबीत करण्याचे ओझे अर्जदारावर आहे. अर्जदाराने नि.क्र. २ च्या यादीसोबत अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विवाहचे एकूण ३ फोटोग्राफ दाखल केले आहे. सदर फोटोग्राफमध्ये अर्जदार व गैरअर्जदार एकमेकांच्या गळयामध्ये हार घालून उभे असल्याचे दिसून येते. प्रकरणी अर्जदाराच्या वतीने नि.क्र. १५ च्या यादीसोबत घाटंजी पोलीस ठाणे येथील गुन्हा क्र. १७६/२०२२ मधील साक्षीदारांच्या बयाणांच्या प्रमाणीत प्रतींच्या छायांकित प्रत दाखल केले आहेत. त्याचे अवलोकन करता, राजेश सुधाकरराव धांदे याने बयाण्मध्ये नमूद केले आहे की, दि. २०/४/२०२१ रोजी त्याला कुणाल कृष्णराव तांगडे याचा फोन आला व त्याने रेणुका माता मंदीर, घाटंजी येथे जावून अर्जदार व गैरअर्जदार यांच्या लग्नाचे फोटो काढले. सदर साक्षीदाराने नमूद केले आहे की, अर्जदार व गैरअर्जदार यांचे लग्न हिन्दु पध्दतीने झाले. सदर बयाण व अभिलेखावर दाखल फोटोग्राफ विचारात घेता, सदर फोटोग्राफवर अविश्वास ठेवण्याचे कारण नाही. अभिलेखावर अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह लावून देणारी व्यक्ती नामे मुकूंद प्रल्हादराव चोपडे याचे बयाण दाखल असून त्यामध्ये त्याने रेणुका माता मंदीर, घाटंजी येथे अर्जदार व गैरअर्जदार यांचे हिन्दु पध्दतीने लग्न लावून दिल्याचे नमूद केले आहे. तसेच अभिलेखावर सुरेश सुखदेवराव सरोदे याचे बयाण दाखल असून त्याने कथन केले आहे की, दि. २९/४/२०२१ रोजी गैरअर्जदार हा अर्जदारास घेवून त्याच्या वडिलाच्या घरी वरच्या मजल्यावर राहण्यास आला होता. ते दोघे अंदाजे दिड महिने भाड्याने राहिले. सदर फोटोग्राफर तसेच घर मालकाचा मुलगा हे स्वतंत्र साक्षीदार असून त्यांच्या बयाणावर सद्यस्थितीत अविश्वास ठेवण्याचे कारण नाही. त्यामुळे मी या

मतास आलो आहे की, ०सकृत दर्शनी अर्जदाराचा गैरअर्जदाराशी विवाह झाल्याचे स्पष्ट होते. गैरअर्जदाराने अर्जदाराचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली, ही बाब शाबीत करण्याकरिता अर्जदाराने अर्जातील कथनांच्या पुष्ठ्यार्थ प्रतिज्ञालेख दाखल केला आहे. अर्जातील कथनांवरुन अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट होते. सदर विवाहची वैधता पुराव्यांती गुणदोषांवर निर्णीत होणार आहे. सद्यस्थितीत अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असल्याचे स्पष्ट होते.

०६) प्रस्तुत मुळ अर्ज दि. २४/०३/२०२२ रोजी दाखल केला असून आजपावेतो गैरअर्जदाराने अर्जदारास निर्वाह भत्ता म्हणून काहीएक रक्कम दिली नसल्याचे स्पष्ट होते. तसेच गैरअर्जदाराने अर्जदाराचे विवाह संबंध नाकारल्याचे स्पष्ट होते.

०७) अर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्जदारास उत्पन्नाचे साधन नाही व ती तिचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. अर्जदारास जगण्यासाठी व चरितार्थासाठी अंतरिम पोटगी जरुरीची आहे. गैरअर्जदारांनी वैवाहीक नातेसंबंध नाकबूल केले आहे. अर्जदाराने गैरअर्जदाराच्या पगारपत्रकाची छायांकित प्रत दाखल केली असून गैरअर्जदारास दरमहा रक्कम रुपये २०,०००/– हाती मिळत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अर्ज मंजूर व्हावा.

०८) गैरअर्जदाराच्या वतीने विद्वान विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदाराने विवाह संबंध नाकबूल केले आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

०९) उभय पक्षकारांची विवादीत कथने व अभिलेखाचा विचार करता, अभिलेखावर अर्जदारास उत्पन्नाचे साधन असले बाबत काहीएक पुरावा दाखल नाही. याउलट, गैरअर्जदाराच्या पगारपत्रकाची छायांकित प्रत दाखल असून त्यावरुन तो न्यायालयात शिपाई पदावर कार्यरत असल्याचे तसेच त्यास दरमहा रक्कम रुपये २०,०८७/– हाती मिळत असल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट होते. त्यामुळे मी या मतास आलो आहे की, अर्जदाराचा सांभाळ करणे हे गैरअर्जदार याचे कायदेशीर व वैवाहीक कर्तव्य आहे. तथापि, गैरअर्जदाराची ऐपत असताना देखील त्याने अर्जदाराचा निर्वाह करण्याबाबत उपेक्षा केली आहे. सबब, वादप्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ करीता :-</u>**

१०) अर्जदार ही गैरअर्जदाराची पत्नी असल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट होत असल्याने तिचा निर्वाह करण्याची कायदेशीर जबाबदारी गैरअर्जदाराची आहे. त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदार याचेकडून अंतरिम पोटगी मिळविणेस पात्र आहेत. अर्जदाराने अभिलेखावर दाखल केलेल्या गैरअर्जदाराच्या पगारपत्रकाचे अवलोकन करता, त्यास दरमहा रक्कम रुपये २०,०८७/– हाती मिळत असल्याचे सकृत दर्शनी स्पष्ट होते. एकंदरीत, गैरअर्जदाराच्या उत्पन्नाचा तसेच सध्याच्या महागाईचा विचार करता, अर्जदाराचे निर्वाह करीता, अर्जदार हीस रक्कम रू. ३,५००/– दरमहा अंतरिम खावटी म्हणून निश्चित करणे न्यायाचे व योग्य आहे. सबब, वादप्रश्न क्र. २ चा निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदविला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.३ करीता :-</u>**

११) प्रकरणी उपरोक्त उहापोह विचारात घेता, मी पुढील आदेश करीत आहे;

## <u>आदेश</u>

(१) अर्ज निशाणी क्र.१२ अंशत: मंजूर करण्यात येतो.

(२) गैरअर्जदारास आदेशीत करण्यात येते की, त्याने अंतरिम पोटगी म्हणून, अर्जदार हिस रक्कम रू. ३,५००/– दरमहा, प्रस्तुत मुळ अर्ज दाखल तारखेपासून म्हणजेच दि. २४/०३/२०२२ पासून, प्रकरणाचा अंतीम निर्णय होईपर्यंत द्यावेत.

(आदेश खुल्या न्यायालयात अधिघोषित केला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2023.05.19 16:02:26 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :– १९/०५/२०२३. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,

(न्या.क्र.१) घाटंजी, जि. यवतमाळ.